# किशोरवयातील व्यक्तित्वविकास: ‘कूल-क्लब’

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये आयोजित होणाऱ्या विविध व्यक्तीमत्व विकास शिबीरांवर एक आक्षेप असा घेतला जातो की वर्षातून काही दिवसांच्या संस्कारांमधून साध्य काय होणार? हा प्रभावी विकासाचा मार्ग आहे की पालकांसाठी काही काळची सोडवणूक? आणि मुलांच्या वेळ आणि शक्तीची तात्पुरती गुंतवणुक?

मला असे वाटते की सद्हेतूने भरवलेल्या दर्जेदार शिबीरांमधून नक्कीच चांगले संस्कार होतात. पण या शिबीरांना ‘प्रवाहीपण’ आणि ‘सातत्य’ नसल्यामुळे त्यावर मर्यादा पडते. आमच्या आय्.पी.अेच्. मानसिक आरोग्य संस्थेतल्या कार्यकर्त्यांना असे वाटले की ही उणीव भरुन काढणारा उप्रकम आखायला हवा. त्यातूनच तीन वर्षांपूर्वी जन्म झाला ‘कूल-क्लब’चा!

‘कूल-क्लब’ हा मुलांनी मुलांसाठी चालवलेला उपक्रम आहे. त्यामध्ये प्रौढ असतात ते केवळ मदत म्हणून. साधारणपणे दहा ते तेरा वर्षांमधले क्लबचे सदस्य जुलै महिन्याच्या अखेरीस एकत्र भेटतात. सोबतीला असतात आय्.पी.अेच्.चे दादा-ताई-मावशा (म्हणजेच मानसशास्त्रज्ञ). हे सारे पुढच्या वर्षामधल्या दर महिन्याच्या संमेलनाचा कार्यक्रम, त्यातले विषय अशा सर्व तपशीलांची आखणी करतात. मुलांच्याच सल्ल्याने पाहुणे तज्ञ म्हणून कुणाला बोलवायचे हे ठरते. आपापल्या छोट्या गटांमध्ये मुले मुलाखतींचे, छंदांचे, शैक्षणिक सहलींचे उपक्रम आखतात. त्याच्या नियोजनात भाग घेतात. वर्ष कसे संपते ते कळत नाही. मे महिन्यामध्ये सर्व ‘कूल-क्लब’ सभासद त्यांच्या कुटुंबीयांसाठी, वर्षाचा अहवाल देणारा दोन तासांचा रंगारंग कार्यक्रम सादर करतात.

दर जुलै महिन्यामध्ये नवीन सभासदांसाठी प्रवेश खुला होतो. जुने सभासद क्लबचा भाग असतातच. ते अधिक जबाबदार होतात. तीन वर्षांपूर्वी आठवीमध्ये असलेले काही सभासद आता मोठे झाले, वयाने आणि समजूतीनेदेखील . . . यंदाच्या वार्षिक कार्यक्रमाच्या सर्व तांत्रिक बाजू त्यांनी सफाईने संभाळल्या.

अनुभव असा आला की उपक्रमात सातत्य असल्यामुळे सकारात्मक बदलाला मिळालेली गती क्षीण होत नाही. आम्ही पालकांकडून नियमित प्रतिसाद घेत असतो. असे लक्षात आले की ‘आपला’ कूल-क्लब असे नाते जुळल्याने मुले-मुली इथे सहभागी व्हायला तयार असतात. हा उपक्रम मोठ्यांचा (किंवा त्यांनी आखलेला, लादलेला) नसून तो आपला आहे ह्या भावनेबरोबरच जबाबदारी येते. यंदाच्या मे

महिन्यातल्या वार्षिक कार्यक्रमाच्या तालमीसुद्धा मुलामुलीनीच आखल्या आणि दृष्ट लागण्यासारखे अंतिम सादरीकरण केले.

कुमारवयातील मुलामुलींना स्वतःच्या क्षमतांची जाणीव होणे आणि ते गुण त्यांच्याकडून योग्य पद्धतीने व्यक्त होणे हा विकासातला मोठा टप्पा आम्ही सर्वांनी प्रत्यक्षात येताना पाहिला. आणि हेच ह्या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. 'कूल-क्लब'च्या निमित्ताने जोडले गेलेले कुमारवयीन विद्यार्थी आणि त्यांचे पालक आय्.पी.अेच्.च्या प्रत्येक उपक्रमाशी जोडले जातात. विकासाचा मार्ग तर खुला होतोच पण भविष्यात कधीही मानसिक आधाराची आणि सल्ल्याची गरज भासली तर ही मुले विनासंकोच आणि वेळीच व्यावसायिक मदत घेऊ शकतात.

मानसिक आरोग्य क्षेत्रातील महत्त्वाचे सूत्र आहे 'कलंक-निवारण' अर्थात् Destigmatization. मानसिक आजार तर बाजूला ठेवू पण मानसिक स्वास्थ्यासाठी सुद्धा शास्त्रीय सल्ला मागायला माणसे कचरतात. 'कूल–क्लब' सारखे व्यक्तिविकासाचे उपक्रम हा खरेतर एक पूल आहे अशा 'कलंका'ची दरी पार करण्याचा! आय्.पी.अेच्.ने गेल्या सव्वीस वर्षांच्या प्रवासात असे अनेक पूल बांधले. व्यक्तीत्व विकासाबरोबरच मानसिक आधाराचे एक स्थान विद्यार्थी आणि कुटुंबाला भविष्यासाठीही उपलब्ध करुन देणारा उपक्रम हे कूल-क्लबचे खास वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे.

- डॉ. आनंद नाडकर्णी

खास सूचना: ह्या वर्षीसाठीची कूल-क्लबची नवी सभासद नोंदणी सुरु झाली असून रविवार दिनांक २६ जुलै रोजी सकाळी ११.३० ते १.३० ह्या वेळामध्ये यंदाच्या शिबीराला सुरुवात होणार आहे. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाच्या मिनीथिएटरमध्ये ह्या निमित्ताने, संस्कार ह्या सूत्राभोवतालचा एक खास गेम शो आयोजित करण्यात येणार असून त्यामध्ये नाट्य-चित्रपट-साहित्य क्षेत्रातील अनेक सेलेब्रिटीज सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम निःशुल्क असून सर्वांसाठी खुला आहे.

अधिक माहितीसाठी रुपा मोरे -९८७०६००२८३ या नंबरवर संपर्क साधावा.